17 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा २४ रोजी दीक्षांत समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ बुधवार दि.२४ रोजी होणार असल्याची माहिती परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे. दीक्षांत कार्यक्रमाच्या अनुषंगाने सविस्तर माहिती काही दिवसातच शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा सोहळा शिवाजी विद्यापीठाचा प्रांगणात होणार आहे. दीक्षांत समारंभाला आठ दिवसाचा कालावधी राहिला असल्यान विद्यापीठ प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे.

17 DEC 2025 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे तंजावर येथे २२ पासून राष्ट्रीय चर्चासत्र

## तंजावर मराठी राज्याच्या सर्वंकष अभ्यासाला मिळणार चालना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंजावर मराठी राज्याचा इतिहास, भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा अभ्यास व संशोधनाला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे तंजावर येथे दि. २२ ते २४ डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे आणि इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ आणि तंजावरचे तमिळ विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार इतिहास व मराठी अधिविभाग यांच्यासह कोल्हापूरचे महावीर महाविद्यालय, अर्जुननगरचे देवचंद महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र होत आहे. तमिळ विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात होणाऱ्या या चर्चासत्राचे उद्घाटन तंजावरचे श्रीमंत शिवाजीराजे भोसले यांच्या हस्ते दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. तंजावरचे अभ्यासक, संशोधक डॉ. विवेकानंद गोपाळ यावेळी बीजभाषण करतील.



यानंतरच्या तीन दिवसांत चर्चासत्रात अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर अभ्यासक व संशोधक मांडणी करतील. यामध्ये डॉ. समीर जाधव, मुंबई (तंजावरचे मराठी नाटक), डॉ. राकेश साळुंखे, सातारा (तामिळनाडूतील अप्रकाशित हस्तलिखिते), बी. रामचंद्र, तंजावर (सरस्वती महाल ग्रंथालयातील अप्रकाशित हस्तलिखिते), डॉ. धनंजय होनमाने, कुंडल (तंजावरची मराठी कीर्तन परंपरा), डॉ. एम. बावानी, तंजावर (तामिळनाडूतील मराठा शिलालेख), डॉ. एस. कविथा, तंजावर (तमिळ साहित्याच्या विकासात मराठ्यांचे योगदान), डॉ. व्ही. सेल्वकुमार, तंजावर (तामिळनाडूमध्ये मराठ्यांचे आगमन आणि योगदान), डॉ. टी. कन्नन, तंजावर (मराठ्यांनी तयार केलेली ऐतिहासिक कागदपत्रे), श्री. मणिमारन, तंजावर (मराठा काळातील ताडपत्रावरील हस्तलिखिते), डॉ. अरुण शिंदे (मध्ययुगीन तंजावरी मराठी साहित्य), डॉ. प्रकाश दुकळे (तंजावरची स्वयंवर काव्ये), डॉ. अशोक शिंदे (आद्य नाटककार शाहाराजे भोसले), डॉ. तेजस चव्हाण, दिल्ली (तंजावरचे मराठी साहित्य), डॉ. सुभाष पाटील, सांगली (तंजावरचे आद्य वाङ्मयसेवक), डॉ. सुखदेव एकल, कोल्हापूर (तंजावर नाटकाचे लेखनतंत्र), डॉ. अशोक तवर, सातारा (तंजावरच्या कला क्षेत्रातील प्रगती), डॉ. धोंडिराम दमामे, ईश्वरपूर (तंजोर चित्रकला शैली), प्रा. परसू गावडे, बेळगाव (तंजावरच्या नाटकातील प्रयोगशीलता), प्रा. प्रतिभा पाटणे, खंडाळा (तंजावरची संस्कृती). याखेरीज, सहभागी सरस्वती महाल ग्रंथालयाला भेट देतील.

तंजावरचे श्रीमंत आबाजीराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ डिसेंबरला दुपारी ४ वाजता चर्चासत्राचा समारोप होईल. महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी अध्यक्षस्थानी असतील.

17 DEC 2025

जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठातर्फे २२ डिसेंबरला तंजावर येथे चर्चासत्र

**कोल्हापूर :** तंजावर मराठी राज्याचा इतिहास, भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा अभ्यास व संशोधनाला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे तंजावर येथे २२ ते २४ डिसेंबर या कालावधीत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे, अशी माहिती मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे आणि इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ आणि तंजावरचे तमिळ विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार इतिहास व मराठी अधिविभाग यांच्यासह कोल्हापूरचे महावीर महाविद्यालय, अर्जुननगरचे देवचंद महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र होत आहे. चर्चासत्राचे उद्घाटन तंजावरचे श्रीमंत शिवाजीराजे भोसले यांच्या हस्ते २२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. तंजावरचे अभ्यासक, संशोधक डॉ. विवेकानंद गोपाळ यावेळी बीजभाषण करतील.तंजावरचे श्रीमंत आबाजीराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ डिसेंबरला दुपारी ४ वाजता चर्चासत्राचा समारोप होईल. चार दिवस विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यातून मराठ्यांची कागदपत्रे, हस्तलिखिते, संस्कृतीची देवाणघेवाण होणार आहे.

**इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांची माहिती**

17 DEC 2025
तरुण भारत

# विद्यापीठातर्फे तंजावर येथे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित

प्रतिनिधी

कोल्हापूर

तंजावर मराठी राज्याचा इतिहास, भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचा अभ्यास व संशोधनाला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे तंजावर येथे सोमवार दि. २२ ते २४ या कालावधीत राष्ट्रीय चर्चासत्राचे होणार आहे, अशी माहिती मराठी अधिविभागाचे डॉ. नंदकुमार मोरे आणि इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठ आणि तंजावरचे तमिळ विद्यापीठ यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार इतिहास व मराठी अधिविभाग यांच्यासह कोल्हापूरचे महावीर महाविद्यालय, अर्जुननगरचे देवचंद महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र होत आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन तंजावरचे श्रीमंत शिवाजीराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर तंजावरचे अभ्यासक, संशोधक डॉ. विवेकानंद गोपाळ यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. याखेरीज, सहभागी संशोधक व शिक्षक सरस्वती महाल ग्रंथालयाला भेट देतील. तंजावरचे श्रीमंत आबाजीराजे भोसले यांच्या उपस्थितीत २४ रोजी चर्चासत्राचा समारोप होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 DEC 2025

पुण्यनगरी

# शब्दांच्या समृद्धीने माणूस अभिव्यक्तीसंपन्न : राऊत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शब्दांची समृद्धी माणसाला अभिव्यक्तीसंपन्न बनवते. शब्दांचा जितका काटेकोर वापर तितकी अभिव्यक्ती परिणामकारक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत आयोजित 'कंटेंट रायटिंग फॉर मीडिया' या मूल्यवर्धित पाठ्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

'आशयपूर्ण लेखन, भाषण शैली स्वरूप व महत्त्व' याविषयी राऊत म्हणाले, शब्द माणसाला माणूस बनवतात, ज्ञान देतात, सुसंस्कृत करतात. त्यामुळे त्यांचा वापर जपून आणि तोलामोलाने करणे गरजेचे आहे. आशयपूर्ण लेखनासाठी भाषा, शब्द, मेंदू यांची सांगड घातली पाहिजे.

तत्पूर्वी, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. माध्यमांच्या वर्तमानकालीन विस्ताराचा वेध त्यांनी घेतला. डॉ. जयसिंग कांबळे यांनी स्वागत केले. डॉ. गीता दोडमणी यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पी. एम. उषा अंतर्गत आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. आलोक जत्राटकर. सोबत मान्यवर.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 DEC 2025 जनप्रवास

# शब्दांच्या समृद्धीनेच अभिव्यक्तीची संपन्नता वाढते

## ज्येष्ठ पत्रकार राऊत: शिवाजी विद्यापीठातील कंटेण्ट रायटिंग फॉर मीडिया पाठ्यक्रमाचे उद्‌घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

शब्दांची समृद्धी माणसाला अभिव्यक्तीसंपन्न बनवते. शब्दांचा जितका काटेकोर वापर तितकी अभिव्यक्ती परिणामकारक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत आयोजित 'कंटेण्ट रायटिंग फॉर मीडिया'या मूल्यवर्धित पाठ्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.'आशयपूर्ण लेखन,भाषण शैली स्वरूप व महत्व'याविषयी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

राऊत म्हणाले, शब्द माणसाला माणूस बनवतात,ज्ञान देतात,सुसंस्कृत करतात. त्यामुळे त्यांचा वापर जपून आणि तोलामोलाने करणे



**शिवाजी विद्यापीठात पी.एम. उषाअंतर्गत आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. आलोक जत्राटकर. सोबत ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत, डॉ. तृप्ती करेकट्टी.**

गरजेचे आहे. शब्दांची समृद्धी अभिव्यक्तीसंपन्नता वाढविते. ही समृद्धी वाचनाने वाढते. लिहिण्याने तिचा पैस विस्तारतो. म्हणून आशयपूर्ण लेखनासाठी भाषा, शब्द,मेंदू यांची सांगड घातली पाहिजे. जितका शब्दांवर प्रभाव तितके सरस लेखन होते.

ते पुढे म्हणाले, शब्दातून बोध होतो. अनेक शब्दांमधून वाक्यबोध, वाक्यांतून तत्वबोध आणि तत्वबोधातून ज्ञानबोध होत असतो. वास्तवता, आवाज, चित्रमयता,व्यक्तीवाचकता, वस्तूवाचकता, वर्णनात्मकता या सर्व गोष्टी कंटेण्ट रायटिंगमध्ये आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर म्हणाले, माध्यमांनी, विशेषतः समाजमाध्यमांनी सर्वसामान्य माणसांच्या जगणे व्यापले आहे. त्यांचा वापर करताना सदैव आपला सद्सद् विवेक जागृत ठेवण्याची आवश्यकता आहे. समाजात पोषक वातावरण निर्मितीसाठी समाज माध्यमांचा तरुणांनी जबाबदारीने वापर करावा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी जबाबदार नागरिक घडवण्यामध्ये माध्यमे मोलाची भूमिका बजावतात, असे सांगितले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. गीता दोडमणी यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

17 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शब्द समृद्धीने माणूस अभिव्यक्ती संपन्न बनतो

- ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत
- शिवाजी विद्यापीठात 'कंटेण्ट रायटिंग फॉर मीडिया' पाठ्यक्रमाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
**कोल्हापूर**

शब्दांची समृद्धी माणसाला अभिव्यक्तीसंपन्न बनवते. शब्दांचा जितका काटेकोर वापर तितकी अभिव्यक्ती परिणामकारक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शिवाजी राऊत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत आयोजित 'कंटेण्ट रायटिंग फॉर मीडिया" या मूल्यवर्धित पाठ्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'आशयपूर्ण लेखन, भाषण शैली स्वरूप व महत्व"यावर त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.



राऊत म्हणाले, शब्द माणसाला ज्ञान, सुसंस्कृत करतात. शब्दांचा वापर जपून करणे गरजेचे आहे. वाचनाने शब्दांची समृद्धी वाढते.

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. समाजमाध्यमांचा वापर करताना भान जागृत ठेवण्याची गरज आहे. समाजात पोषक वातावरणसाठी समाजमाध्यमांचा तरुणांनी जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी स्वागत केले. डॉ. गीता दोडमणी यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रकाश निकम यांनी आभार मानले.

17 DEC 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात उद्या पर्यावरण शिक्षकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाविद्यालयातील पर्यावरण विषयाच्या अध्यापकांसाठी गुरुवार, दि. १८ रोजी पर्यावरण जाणीव-जागृती एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. गणित अधिविभागाच्या सभागृहात सकाळी ११ ते ५ या वेळेत होणाऱ्या कार्यशाळेचे आयोजन शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि पर्यावरण संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे.



यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख पाहुणे असणार आहेत. अधिसभा सदस्य डॉ. मनोज पाटील, पर्यावरणशास्त्राचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रकाश राऊत, पर्यावरण सल्लागार डॉ. श्रुती कुलकर्णी, पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव हे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

17 DEC 2025

तरुण भारत

# विद्यापीठात उद्या पर्यावरण शिक्षकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि पर्यावरण संरक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या गुरुवारी दि.१८ रोजी महाविद्यालयातील पर्यावरण विषयाच्या अध्यापकांसाठी पर्यावरण जाणीव-जागृती एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. गणित अधिविभागाच्या सभागृहात सकाळी ११ ते ५ या वेळेत कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेला कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेला अधिसभा सदस्य डॉ. मनोज पाटील, डॉ. प्रकाश राऊत (माजी विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र अधिविभाग), डॉ. श्रुती कुलकर्णी (पर्यावरण सल्लागार) तसेच डॉ. आसावरी जाधव (विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र अधिविभाग) हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

17 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात स्टेम कार्यशाळेचे उद्‌घाटन

कोल्हापूर : प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात 'स्टेम" अध्यापनशास्त्र 'इनोवेटीव स्टेम पेडागॉजी : ब्रीजिंग थिअरी अँड प्रॅक्टिस" विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. यावेळी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. अजय साळी म्हणाले, स्टेम अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून गरजेची बाब आहे. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे होत्या. समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रुपाली संकपाळ, डॉ. एन. डी. देशमुख, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, ममता घोटल, अतुल जाधव उपस्थित होते.

17 DEC 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात सहा दिवसीय कार्यशाळेस प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि महिंद्रा प्राइड क्लासरूम, नांदी फौंडेशन, हैदराबाद यांच्या वतीने 'जॉब रेडीनेस अंडर एम्प्लॉएबिलीटी स्किल्सस फॉर स्टुडंट टीचर' या विषयावर सहा दिवसीय कार्यशाळेस प्रारंभ झाला. २० डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या कार्यशाळेत शिक्षक, विद्यार्थ्यांना एकविसाव्या शतकातील कौशल्ये व जागतिक शिक्षणाचे बदलते स्वरूप याचे आकलन व त्याची तयारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी सांगितले. कार्यशाळेमध्ये स्त्री शिक्षकांचा व्यक्तिमत्व विकास व सक्षमीकरण या विषयाच्या अनुषंगाने महिंद्रा प्राइड क्लासरूमच्या मुस्कान चावला प्रशिक्षक म्हणून कार्य पाहत आहेत. शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा सुरू आहे.

17 DEC 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ९४ अभ्यासक्रम परिक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेच्या मंगळवारी ९४ विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने संपन्न झाल्या. विविध १६३ परीक्षा केंद्रांवर त्या पार पडल्या. परिक्षांसाठी ९ हजार २०२ विद्यार्थी उपस्थित होते. मंगळवारी ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर १६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. या परिक्षेसाठी विद्यापीठाने परिक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून सांगली ५ व सातारा ४ अशा एकूण ९ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली असून कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली नाही. परिक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

17 DEC 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षांना ९२०२ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी विविध ९४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १६३ परीक्षा केंद्रांवर झाल्या. या परीक्षांसाठी ९ हजार २०२ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून, १६० अभ्यासक्रमांचे निकाल लावण्यात परीक्षा विभागाने यश मिळवले. गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेल्या भरारी पथकाकडून, सांगली जिल्ह्यात ५, सातारा जिल्ह्यात ४ अशा ९ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे केली आहे.

17 DEC 2025
पुढारी

# विद्यापीठाच्या १६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर सत्रातील आजअखेर सुमारे १६० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले. संलग्न महाविद्यालयांत पदवी,पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. मंगळवारी बीए, बीव्होक, बीएस्सी, एमए, एमएसडब्ल्यू, बीफार्मसी, बीटेक, बॅचलर ऑफ लॉ, डिप्लोमा इन इंडस्ट्रियल हेल्थ अँड एन्व्हायर्न्मेंट आदी ९४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ९ हजार २०२ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १६ रोजी एमए (ट्रॅव्हल टूरिझम), पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, बीएड, एमएड, आदी ९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

17 DEC 2025

लोकमत

# संशोधकांनी नवा ज्ञानप्रवाह निर्माण करावा : थोरात

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधकांनी बहुआयामी ज्ञान संपादन करून विविध ज्ञानशाखांच्या संगमातून नवा ज्ञानप्रवाह निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत, असे प्रतिपादन आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये सुरू असलेल्या '५ व्या आंतरराष्ट्रीय परिषद : फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन'मध्ये उपस्थित संशोधकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विविध तांत्रिक सत्रांमध्ये जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया येथील नामवंत शास्त्रज्ञांनी आरोग्य, ऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञान या विषयी मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात मुंबई विद्यापीठाचे डॉ. पी. बी. सरवदे आणि इंदूर येथील राजा रामण्णा सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. पुष्पेन मंडल यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. केशव राजपुरे होते. भारतीय संशोधकांनी प्रगत साधन-सामग्री व उपकरणांद्वारे देशांतर्गत तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज असल्याचे डॉ. मंडल यांनी सांगितले.

दुपारच्या सत्रात आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. नानासाहेब थोरात व दक्षिण कोरियाच्या चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. मयूर गायकवाड यांनी 'बायो-मटेरियल्स' व त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील उपयोजन याविषयी माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब मोहोळकर होते.

जर्मनीतील कील युनिव्हर्सिटीचे डॉ. अमर पाटील, ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्सचे डॉ. एम. पी. सूर्यवंशी व दक्षिण कोरियाच्या सुंगक्युकवान युनिव्हर्सिटीचे डॉ. रवींद्र बुलाखे यांनी सौरऊर्जा आणि बॅटरी तंत्रज्ञानातील नवप्रवाहांची माहिती दिली. डॉ. हेमराज यादव अध्यक्षस्थानी होते.

1 7 DEC 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशस्वी होण्यासाठी चांगले वाचन आवश्यक

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

**उचगाव :** चांगले वाचा, चांगले वेचा, त्यातून जीवनात यशस्वी होता येईल, यासाठी प्रचंड वाचन करून प्रत्येकाने ज्ञानी हावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. महावीर महाविद्यालयात आयोजित केलेल्या स्वातंत्र्य सैनिक कै. दादाबो लडगे चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत विद्यार्थी गुणगौरव समारंभात गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सेक्रेटरी मोहनराव गरगटे होते. तर संचालक दिलीप लडगे प्रमुख म्हणून उपस्थित होते. यावेळी ३६ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



सत्कार करताना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी, दिलीप लडगे, डॉ. शरद गायकवाड आदी.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अखंड वाचन केले पाहिजे. प्रत्येक पुस्तकात काहीना काही चांगले असते. शिकलेले प्रत्येक ज्ञान वापरत आणले पाहिजे. जे अवघड ते सोपे करा. जे सोपं आहे ते सुंदर बनवा. त्यासाठी जे ज्ञान घेतले ते शक्ती बनवा. आई, वडील, शिक्षक हे तुमच्या भल्याचा विचार करत असतात. त्यांना कधीही दुःखवू नका. तुम्ही मोठे झाल्यावर तुमच्या यशाचं पाणी त्यांच्या डोळ्यात येण्यासाठी खूप कष्ट आणि अभ्यास करा, उंच भरारी घ्या, एवढे यश संपादन करा. त्यांना व इतरांना पाहण्यासाठी मान उंच करावी लागेल. या पुढचा काळ बौद्धिक कौशल्यांचा असणारा आहे. तुमचे मिशन ठरवा. मला काय करायचे आहे, ते ध्येय निश्चित करा. थोरा मोठ्यांची चरित्रे वाचा. तुमची आकलन क्षमता जबरदस्त आहे. तो टॅलेंट वापरून तुमचं व्यक्तिमत्त्व चांगले तयार होईल, असे त्यांनी सांगितले.यावेळी डॉ. महादेव शिंदे, कनिष्ठ विभागाचे समन्वय प्रा. जावेद मेस्त्री, विज्ञान विभागाचे प्रा. राहुल आडके, प्रा. सोनल वाळवेकर, प्रा. हेमंत पाटील, तसेच मान्यवर विद्यार्थी, प्राध्यापक गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. स्वागत प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्वेता परुळेकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. संध्या जाधव यांनी केले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले.

17 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशस्वी होण्यासाठी चांगले वाचन आवश्यक

- कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन
- महावीर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा

प्रतिनिधी
कोल्हापूर

चांगले वाचा, चांगले वेचा, त्यातून जीवनात यशस्वी होता येईल. यासाठी प्रचंड वाचन करून प्रत्येकांनी ज्ञानी हावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

महावीर महाविद्यालयात आयोजित केलेल्या स्वातंत्र्यसैनिक कै. दादोबा लडगे चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कृत विद्यार्थी गुणगौरव समारंभात गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सेक्रेटरी मोहनराव गरगटे होते. संचालक दिलीप लडगे प्रमुख म्हणून उपस्थित होते. यावेळी ३६ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शिंदे पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अखंड वाचन केले पाहिजे. प्रत्येक पुस्तकात काहीना काही चांगले असते. शिकलेले प्रत्येक ज्ञान वापरत आणले पाहिजे. जे अवघड ते सोपा करा आणि जे सोपे आहे ते सुंदर बनवा. त्यासाठी जे ज्ञान घेतले ते शक्ती बनवा. आईवडील, शिक्षक हे तुमच्या भल्याचा विचार करत असतात. त्यांना कधीही दुखवू नका. तुम्ही मोठे झाल्यावर तुमच्या यशाचे पाणी त्यांच्या डोळ्यात येण्यासाठी खूप कष्ट आणि अभ्यास करा. उंच भरारी घ्या. एवढे यश संपादन करा की त्यांना व इतरांना पाहण्यासाठी मान उंच करावी लागेल. या पुढचा काळ बौद्धिक कौशल्यांचा असणारा आहे. तुमचे मिशन ठरवा. मला काय करायचे आहे. ते ध्येय निश्चित करा. थोरा-मोठ्यांची चरित्रे वाचा. टॅलेंट वापरल्यास तुमचं व्यक्तीमत्व चांगले तयार होईल, असे त्यांनी सांगितले.




**कोल्हापूर : गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. अव्दैत जोशी, दिलीप लडगे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. महादेव शिंदे आदी.**

यावेळी डॉ. महादेव शिंदे, कनिष्ठ विभागाचे समन्वय प्रा. जावेद मेस्त्री, विज्ञान विभागाचे प्रा. राहुल आडके, प्रा. सोनल वाळवेकर, प्रा. हेमंत पाटील तसेच मान्यवर विद्यार्थी, प्राध्यापक गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. स्वागत आणि प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अव्दैत जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्वेता परुळेकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. संध्या जाधव यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले.

1 7 DEC 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# विद्यापीठात ३० रोजी संत साहित्य संमेलन

## डॉ. सदानंद मोरे उद्घाटक; ग्रंथदिंडी, भजन, अभंगवाणी आदी कार्यक्रमांची पर्वणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व भाषा विकास संशोधन संस्था आणि शिवाजी विद्यापीठांतर्गत संत तुकाराम अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० डिसेंबर रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात 'संत साहित्य संमेलन २०२५'चे आयोजन केले आहे.

ग्रंथदिंडीने संमेलनास सुरुवात होणार आहे. सकाळी ९ वाजता प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पालखी पूजन होईल. याप्रसंगी पारंपरिक वारकरी भजन, लेझीम आणि झिम्मा फुगडी कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. सतीश बडके संमेलनाध्यक्ष असतील. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी हे सत्राध्यक्ष असणार आहेत.



शिवाजी विद्यापीठातून

याप्रसंगी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. प्रवीण बांदेकर, शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

### संमेलनात होणार अभ्यासपूर्ण मंथन

**संमेलनात संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्यासह इतर संतांचे साहित्य, वारकरी परंपरा, भक्ती चळवळ व आधुनिक काळातील तिचे सामाजिक-सांस्कृतिक योगदान यावर अभ्यासपूर्ण मंथन होणार आहे. तसेच परिसंवाद, चर्चासत्रे, संतवाङ्‌मयाचे सादरीकरण तसेच वारकरी संप्रदायातील लोककला व विचारधारेवर आधारित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

दुपारी १२ ते २ यावेळेत 'वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान' या विषयावर परिसंवाद होणार आहे. दुपारी ३ वाजता 'वारी एक आनंदयात्रा' या विषयावर ज्येष्ठ छायाचित्रकार आणि वारी अभ्यासक संदेश भंडारे यांचा मुलाखत कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता श्री दत्त भजनी मंडळ, शिपूर, ता. मिरज (जि. सांगली) यांचा कबीरपंथी भजन कार्यक्रम होणार आहे.

विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागाच्या अभंगवाणी कार्यक्रमाने सायंकाळी ५ वाजता संमेलनाचा समारोप होईल. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन भाषाविकास संस्थेचे अध्यक्ष रणधीर सुतार, संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

17 DEC 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात रविवारी संविधान दौड

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या वतीने देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या स्मृती दिनानिमित्त रविवारी (ता. २१) शिवाजी विद्यापीठात संविधान दौड होणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मगदूम म्हणाले, 'ही दौड समाजात संविधानिक मूल्ये रुजवणे, आरोग्यविषयक जागृती आणि प्लास्टिकमुक्त पर्यावरणपूरक जीवनशैली निर्माण करणे, या उद्देशाने आयोजित केली आहे. रविवारी सकाळी सात वाजता १६, २५, ४० आणि ५५ वर्षांवरील महिला, पुरुष अशा गटांत दौड घेतली जाणार आहे. प्रत्येक गटातील विजेत्याला पाच हजार, तर दुसरा क्रमांक मिळवणाऱ्यांसाठी चार हजार आणि तिसरा क्रमांक पटकाविणाऱ्यांसाठी तीन हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय उत्तेजनार्थ चौथ्या आणि पाचव्या क्रमांकांना दोन हजार रुपये व सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविले जाणार आहे. या दौडीमध्ये बाराशेहून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आदींच्या उपस्थितीत होणार आहे.

पत्रकार परिषदेस कॉमर्स कॉलेजच्या प्राचार्या वर्षा मैंदर्गी, शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य प्रवीण पाटील, नाईट कॉलेजचे प्राचार्य उत्तम पाटील, डॉ. सुरेश फराकटे, प्रा. अरुण शिंदे, प्रा. प्रकुल मांगोरे-पाटील उपस्थित होते.